MHWS110004382026

<u>सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कारंजा (लाड) यांचे न्यायालयात</u>

(पिठासीन अधिकारी पी. डी. देवरे)

<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २४८/२०२३.</u>

१. **देवकाबाई विठ्ठल उर्फ विठ्ठु सरदार**
वय ७० वर्ष, व्यवसाय – गृहिणी

२ **बेबी वसंतराव जवंजाळ**
वय ४८ वर्ष, व्यवसाय – गृहिणी

३. **आशा  मिलींद जवंजाळ**
वय ४६ वर्ष, व्यवसाय – गृहिणी
अर्जदार क्र. ०२ व ०३ रा. बेलोरा हिरापुर,
अमरावती, ता. जि. अमरावती

४. **विलास विठ्ठल उर्फ विठ्ठु सरदार**
वय ४५ वर्ष, व्यवसाय –शेती

५. **राजु विठ्ठल उर्फ विठ्ठु सरदार**
वय ४३ वर्ष, व्यवसाय – शेती
अर्जदार क्र. ०१, ०४ व ०५ रा. सिरसोली,
ता. कारंजा, जि. वाशिम,
ह. मु. दत्तुवाडी, महाजनपुरा, अमरावती,
ता. जि. अमरावती **.... अर्जदार**

**<u>– विरूध्द –</u>**

दि.कि.अर्ज.क्र. २४८/२०२३

**दामोदर श्रावण सरदार** **.... हरकतदार**

**दावा– बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी अर्ज.**

..........................................................................................................

अर्जदारांतर्फे मा. विधीज्ञ **श्री. ए. ए. पवार**

हरकतदारातर्फे मा. विधीज्ञ – **श्री. एस. एम. वासनीक**

..........................................................................................................

**निशाणी क्र.०१ वरील आदेश**

प्रस्तुत अर्ज मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु बुधाजी सरदार यांचा वारस दाखला मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. **अर्जदार यांचे कथन खालीलप्रमाणे –**

मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु बुधाजी सरदार हे अर्जदार क्र. ०१ चे पती व अर्जदार क्र. ०२ ते ०५ यांचे वडिल आहे. विठ्ठल उर्फ विठ्ठु यांचा मृत्यु दिनांक ०९/०५/२००७ रोजी धनज बु., ता. कारंजा, जि. वाशिम येथे झाला. मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु यांची आईसुध्दा पुर्वीच मयत झालेली आहे. करिता अर्जदारांव्यतिरिक्त मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु यांना अन्य कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

३. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदारांना ते मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु यांचे वारस असलेबाबत शासकिय व निमशासकिय कामाकरीता वारस दाखला आवश्यक आहे. सबब, अर्जदारांनी मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेसाठी विनंती केलेली आहे.

४. निशाणी क्रमांक ०१ वर आदेश पारित करुन दिनांक ०२/०१/२०२४ रोजीच्या 'दैनिक सायरन' निशाणी क्र.२० या वर्तमानपत्रातुन जाहीर प्रगटन देवून तसेच जाहीरनाम्याद्वारे हरकती मागविण्यात आल्या होत्या.

५. सदर अर्जाकामी दामोदर श्रावण सरदार हे हजर झाले व त्यांनी सदर अर्जास नि. क्र. ०८ वर त्यांची हरकत नोंदवली. त्यांचा असा आक्षेप आहे की, ते मयत विठ्ठल उर्फ

विठ्ठु बुधाजी सरदार यांचे सख्खे पुतणे आहे. त्यामुळे ते देखील मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु यांचे कायदेशीर वारस आहे. मौजे अंबोडा, ता. कारंजा, जि. वाशिम येथिल गट क्रमांक ९८, क्षेत्रफळ ०० हेक्टर ८८ आर या शेतजमिनीबाबत अर्जदार क्र. ०१ हिने त्यांचेसोबत वाद केलेला असून अर्जदार क्र. ०१ सदर मिळकत हडपण्याच्या विचारात आहे. हरकतदार हेदेखील मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु यांचे कायदेशीर वारस आहे. त्यामुळे वारस दाखला देताना हरकतदार यांच्या नावानेदेखील वारस दाखल देण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

६. अर्जदारांच्या कथनांवरून व हरकतदाराच्या हरकतीवरुन माझेसमोर खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु बुधाजी सरदार यांचे कायदेशीर वारस असल्याचे शाबीत करतात काय? | **होय** |
| २. | हरकतदार हे मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु बुधाजी सरदार यांचे कायदेशीर वारस असल्याचे शाबीत करतात काय? | **नाही** |
| ३. | अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला मिळण्यास पात्र आहेत काय? | **होय** |
| ४. | हरकतदार हे मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला मिळण्यास पात्र आहेत काय? | **नाही** |
| ५. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दे क्र.१ ते ५ बाबत –</u>**

७. सदर अर्जाचे पुष्टयर्थ अर्जदार क्र. ०४ विलास विठ्ठल उर्फ विठ्ठु सरदार यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्रमांक ११ वर दाखल केले आहे. मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु यांच्या मृत्यु दाखल्याची प्रमाणित प्रत निशाणी क्र. १४ वर, अर्जदारांच्या आधारकार्डच्या पडताळणी केलेल्या प्रती अनुक्रमे निशाणी क्र. १५ ते १९ वर व 'दैनिक सायरन' या वर्तमानपत्राची प्रत निशाणी क्र. २० वर असे दस्तऐवज दाखल केलेले आहेत.

८. वेळोवेळी संधी देवूनही हरकतदार यांनी अर्जदाराच्या साक्षीदाराचा उलटतपास घेतला नाही अथवा त्यांच्या हरकतीतील कथने शाबीत करण्यासाठी कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा दिला नाही.

९. जाहीर नोटीस दिल्यानंतरही प्रस्तुत अर्जामध्ये हरकतदार वगळता इतर कोणीही हजर झाले नाही, अगर आपली हरकत नोंदविलेली नाही.

१०. अर्जदारांच्या वतीने त्यांच्या मा. विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदारांव्यतिरीक्त मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

११. अभिलेखावर दाखल कागदपत्रे व पुराव्यावरुन असे निदर्शनास येते की, अर्जदार हे मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु यांचे कायदेशीर वारस असल्याची बाब हरकतदार यांनी नाकारलेली नाही. त्यांची एवढीच हरकत आहे की, तेदेखील मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु यांचे कायदेशीर वारस आहे. हरकतदार यांनी अर्जाकामी हरकत नोंदविलेली असली तरी त्यांनी अर्जदारांच्या साक्षीदाराचा उलटतपास घेतला नाही अथवा त्यांची हरकत नि. क्र. ०८ मधील कथनांच्या शाबितीसाठी स्वतःची अथवा इतर कोणत्याही साक्षीदाराची साक्ष नोंदविली नाही अथवा इतर कोणताही कागदोपत्री पुरावा दिला नाही.

१२. याठिकाणी हरकतदार हे मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु बुधाजी सरदार यांचे कायदेशीर वारस आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी हिंदु वारसा कायदा कलम ९ सह कलम ८ चे परिशिष्टाचा आधार घेणे योग्य होईल. सदर कायदयाच्या कलम ८ च्या परिशिष्टाचे अवलोकन केले असता अर्जदार हे मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु यांचे वर्ग– १ चे वारस असल्याचे दिसून येते. हरकतदार यांनी त्यांचा मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु व अर्जदार यांचेशी त्यांचा नेमका काय नातेसंबंध आहे याबाबत काहीएक पुरावा दाखल केलेला नाही. हरकतीतील कथने शाबित करण्याची जबाबादारी हरकतदाराची होती. परंतु त्यांनी त्यांच्या हरकतीमधील कथने शाबित करणेसाठी कोणताही पुरावा दिलेला नाही. त्यामुळे त्यांच्या हरकतीतील कथने मान्य करता येणार नाही. याउलट सदर परिस्थितीत भारतीय पुरावा कायदा कलम ११४ चे उदाहरण (ग) नुसार हरकतदाराविरुध्द अनुमान काढता येईल.

**१३.** अर्जदारांनी त्यांच्या अर्जाकामी दिलेला पुरावा हा विनाआव्हानीत राहीला व सदर पुराव्यावर अविश्वास दर्शवावा असे कोणतेही कारण दिसून येत नाही. वरील परिस्थितीत अर्जदार हे मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु यांचे वर्ग–१ चे वारस असल्यामुळे ते अर्जातील मागणीप्रमाणे वारस दाखला मिळणेस पात्र आहे. याउलट हरकतदार यांनी त्यांची हरकत व त्यांचे मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु यांच्याशी असलेला नातेसंबंध पुराव्यानीशी शाबीत केलेला नसल्यामुळे हरकतदार हे त्यांचे हरकतीत मागणी केल्याप्रमाणे ते मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळण्यास पात्र ठरत नाही.

**१४.** सबब, वरील विवेचनावरुन हे न्यायालय मुद्दा क्र. ०१ व ०३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवत आहे व मुद्दा क्र. ०२ व ०४ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे आणि मुद्दा क्रमांक ०५ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार हे मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु बुधाजी सरदार यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा दाखला देण्यात यावा.

३. हरकतदार यांची ते मयत विठ्ठल उर्फ विठ्ठु बुधाजी सरदार यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा दाखला मिळण्याबाबतची मागणी नामंजुर करण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PANDIT DAGU DEORE
Date: 2026.05.02 18:05:30 +0530

दिनांकः ०२/०५/२०२६.

**(पी. डी. देवरे)**
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
कारंजा (लाड).

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | K. A. Paraswai (Stenographer-III) |
| Court Name | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Karanja. Dist. Washim. |
| Date | :- | 02/05/2026 |
| Typed On | :- | 02/05/2026 |
| Checked On | :- | 02/05/2026 |
| Order signed by the presiding officer on | :- | 02/05/2026 |
| Order uploaded on | :- | 02/05/2026 |